**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीत देशातल्या जनतेचा कल पुन्हा राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या बाजूनं, पण बहुमताचा आकड्यापासून भाजपा अद्याप दूर
- देशात इंडिया आघाडीला २३३ जागा, काँग्रेस शंभरीच्या उंबरठ्यावर
- महाराष्ट्रात नागरिकांची महाविकास आघाडीला पसंती, १३ जागांसह काँग्रेस राज्यातला सर्वात मोठा पक्ष होण्याच्या मार्गावर
- राष्ट्रीय लोकशाही आघाडीवर नागरिकांना पुन्हा विश्वास दाखवल्याबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडून देशवासियांचे आभार, देशातल्या नागरिकांनी लोकशाही कौल दिल्याची काँग्रेसची प्रतिक्रिया
- आंध्रप्रदेश विधानसभा निवडणुकीत तेलगु देसमला सुमारे २ तृतीयांश जागा तर ओडिशामध्ये भाजपाला बहुमत

  **आणि**
- देशातल्या शेअर बाजारात मोठी पडझड, काल कमावलेल्या तेजीच्या तुलनेत सुमारे दुप्पट घसरण

**<><><><><>**

लोकसभा निवडणुकीची मतमोजणी अद्याप सुरू असून आतापर्यंत सर्व म्हणजे ५४३ जागांचे कल स्पष्ट झाले आहेत. यातल्या अनेक जागांवरचे निकालही जाहीर झाले आहेत.

भाजपाने सर्वाधिक १२२ जागा जिंकल्या असून ११८ जागांवर ते आघाडीवर आहेत. काँग्रेसने ५३ जागा जिंकल्या असून ४६ जागांवर ते आघाडीवर आहेत.

समाजवादी पक्षाने आतापर्यंत १६ जागांवर विजय मिळवला आहे. तर २१ जागांवर पक्षाचे उमेदवार आघाडीवर आहेत. तृणमूल काँग्रेसने ६ जागा जिंकल्या असून २३ जागांवर ते आघाडीवर आहेत.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे २ उमेदवार विजयी झाले असून ७ मतदारसंघात त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत.

राष्ट्रवादी काँग्रेस शरच्चंद्र पवार पक्षाने एक जागा जिंकली असून पक्षाचे उमेदवार ६ जागांवर प्रतिस्पर्ध्यापेक्षा पुढं आहेत.

द्रविड मुन्नेत्र कळघमने ३ जागा जिंकल्या असून १९ जागांवर त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत.

तेलुगु देसमने २ जागा जिंकल्या असून १४ मतदारसंघात त्यांनी आघाडी घेतली आहे.

जेडीयूने ३ जागा जिंकल्या असून ९ जागांवर त्यांचे उमेदवार आघाडीवर आहेत.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ३ जागांवर विजयी झाला असून एका मतदारसंघात त्यांचा उमेदवार आघाडीवर आहे.

आरजेडी ४ जागांवर तर झारखंड मुक्ती मोर्चा ३ जागांवर आघाडीवर आहे.

आम आदमी पार्टीच्या ३ उमेदवारांनी विजय मिळवला आहे.

भाकपला आणि माकप लेनिनवादी पक्षाला प्रत्येकी दोन जागांवर आघाडी मिळाली आहे.

**<><><><><>**

२०१९ च्या सार्वत्रिक निवडणुकीत ३०३ जागा जिंकून सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या भारतीय जनता पक्षानं यंदाच्या निवडणुकीत १२२ मतदारसंघांमध्ये विजय मिळवला आहे, तर ११८ जागांवर भाजपा आघाडीवर आहे. म्हणजे एकूण २४० जागा भाजपाला मिळण्याची शक्यता असली तरी गेल्या वेळच्या तुलनेत त्यांच्या ६३ जागा कमी होण्याची चिन्हं आहेत.

काँग्रेसनं गेल्या निवडणुकीत ५२ जागा जिंकल्या होत्या. यंदा ५३ जागांवर काँग्रेसच्या उमेदवारांचा विजय झाला आहे, तर ४६ ठिकाणी काँग्रेस आघाडीवर आहे. एकूण ९९ जागा मिळत असल्यानं काँग्रेसच्या जागा ४७ नं वाढत असल्याचं चित्र आहे.

समाजवादी पक्षानं १६ जागांवर विजय निश्चित केला आहे, तर २१ ठिकाणी आघाडी घेतली आहे. या पक्षाला गेल्या निवडणुकीत पाच जागा मिळाल्या होत्या. आता त्यांच्या खासदारांची संख्या पाचवरून ३७ वर जाण्याची चिन्हं आहेत.

२०१९च्या निवडणुकीत २२ जागांच्या बळावर तिसऱ्या क्रमांकाचा सर्वात मोठा पक्ष ठरलेल्या तृणमूल काँग्रेसनं यावेळी आतापर्यंत ५ जागा जिंकल्या असून, २४ मतदारसंघांमध्ये आघाडी घेतली आहे. तृणमूलच्या जागा ७ नं वाढण्याचा अंदाज आहे.

तमिळनाडूतला महत्त्वाचा पक्ष असलेल्या द्रविड मुन्नेत्र कळगम अर्थात द्रमुकनं २०१९ मध्ये २४ जागा जिंकल्या होत्या. यंदा द्रमुकनं तीन जागा जिंकल्या आहेत आणि १९ जागांवर पुढे आहे. त्यांची यंदा दोन जागांनी पीछेहाट होताना दिसत आहे.

अविभाजित शिवसेनेला गेल्या निवडणुकीत १८ मतदारसंघांमध्ये विजय मिळाला होता. या निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष एका मतदारसंघात

विजयी झाला आहे, तर ९ ठिकाणी आघाडीवर आहे. तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची शिवसेना ६ ठिकाणी आघाडीवर आहे.

गेल्या निवडणुकीत तीन जागा मिळवलेला तेलुगु देसम पक्ष यंदा दोन जागांवर विजयी झाला आहे, तर १४ ठिकाणी पुढे आहे. त्यांच्या खासदारांच्या संख्येत जवळपास चौपटीनं वाढ होण्याची शक्यता आहे.

२०१९ मध्ये एका ठिकाणी विजयी झालेला झारखंड मुक्ती मोर्चा हा पक्ष या निवडणुकीत तीन जागांवर आघाडीवर आहे.

गेल्या निवडणुकीत एका मतदारसंघात विजयी झालेल्या एआयएडीएमकेला यंदा मात्र खातं उघडता आलेलं नाही.

२०१९ मध्ये आम आदमी पक्षानं एका जागेवर विजय मिळवला होता. यंदा आपच्या तीन उमेदवारांनी विजय मिळवला आहे.

कम्युनिस्ट पक्षाला गेल्या निवडणुकीत दोन जागा मिळाल्या होत्या. याही निवडणुकीत हा पक्ष दोन जागांवर पुढे आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षानं २०१९ मध्ये तीन खासदार लोकसभेवर पाठवले होते. यंदा या पक्षाचा तीन उमेदवार विजयी झाले आहेत, तर एके ठिकाणी पक्ष आघाडीवर आहे.

राष्ट्रीय पक्षांचा विचार करता या निवडणुकीत भाजपला सर्वाधिक नुकसान होण्याची, तर काँग्रेसला मोठा फायदा होण्याची चिन्हं आहेत. समाजवादी पक्ष आणि तेलुगू देसम यांच्या खासदारांच्या संख्येतही तुलनेने चांगलीच वाढ होण्याची शक्यता दिसत आहे.

**<><><><><>**

या लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महाविकास आघाडीनं मोठी मुसंडी मारली आहे. आतापर्यंत १० जागांचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यात भाजपानं ३, शिवसेना आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे या पक्षांनी प्रत्येकी दोन, तर काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार, या पक्षांनी प्रत्येकी एक जागा जिंकली आहे.

याशिवाय १२ जागांवर काँग्रेसचे उमेदवार आघाडीवर आहेत. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार ७ जागांवर, तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार ६ मतदारसंघांमधे आघाडीवर आहेत. तर महायुतीमधे भाजपा ७, आणि एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालच्या शिवसेना पक्षाचे उमेदवार ५ जागांवर आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

राज्यातल्या अनेक लढती लक्ष्यवेधी ठरल्या. अनेक केंद्रीय आणि राज्यातल्या मंत्र्यांची प्रतिष्ठा या निवडणुकीत पणाला लागली होती, त्याच बरोबर बारामती, ठाणे, कल्याण यासारख्या मतदारसंघातल्य लढती अत्यंत प्रतिष्ठेच्या ठरल्या होत्या.

त्यात नितीन गडकरी,  पीयूष गोयल, नारायण राणे, संदीपान भुमरे यांना मतदारांनी पाठिंबा दिला आहे. मात्र रावसाहेब दानवे, भारती पवार, कपिल पाटील, सुधीर मुनगंटीवार मतदारांच्या पसंतीला उतरले नाहीत.

**<><><><><>**

वायव्य मुंबई मतदारसंघात शिवसेनेचे रविंद्र वायकर फेरमतमोजणीत विजयी झाले आहेत. त्यांनी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अमोल कीर्तीकर यांच्यावर ४८ मतांनी विजय मिळवला.

**<><><><><>**

अनेक महत्वाच्या नेत्यांच्या मतदारसंघाचे कल आणि निकाल आतापर्यंत जाहीर झाले आहेत.

प्रधानमंत्री आणि भाजपाचे ज्येष्ठ नेत नरेंद्र मोदी यांचा वाराणसी मतदारसंघातून विजय झाला. त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराचा त्यांनी १ लाख ४५ हजार मतांनी पराभव केला. भाजपाचे ज्येष्ठे नेते अमित शहा हे गांधीनगर लोकसभा मतदारसंघातून ७ लाख २५ हजार मतांच्या फरकाने विजयी झाले. काँग्रेसचे ज्येष्ठे नेते राहुल गांधी हे रायबरेली आणि वायनाड अशा दोन्ही मतदारसंघात विजयी झाले आहेत. तर केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांना अमेठीतून काँग्रेसचे किशोरी लाल यांच्याकडून पराभव पत्करावा लागला.

केंद्रीय मंत्री अनुराग ठाकुर हमीरपूर मतदारसंघातून १ लाख ७७ हजार मतांच्या फरकाने विजयी झाले आहेत. धारवाड मतदारसंघातून प्रल्हाद जोशी, तिरुवनंतपुरममधून शशी थरूर, अलपुझ्झामधून के. सी. वेणुगोपाल, नागपूरमधून नितीन गडकरी, गुना मतदारसंघातून ज्योतिरादित्य सिंधिया, मंडी मतदारसंघातून कंगना रनौत हे विजयी झाले आहेत.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह हे लखनौ लोकसभा मतदारसंघात आपल्या प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा एक लाख मतांनी आघाडीवर आहेत. तर विदिशामधून शिवराजसिंह चौहान, बारामतीमधून सुप्रिया सुळे, दिब्रुगडमधून सर्वानंद सोनोवाल हे प्रतिस्पर्धी उमेदवारापेक्षा आघाडीवर आहेत.

जम्मू काश्मीरच्या अनंतनाग रजौरी मतदारसंघातून मेहबुबा मुफ्ती, बारामुल्ला मतदारसंघातून ओमर अब्दुला, बंगलोर ग्रामीणमधून डी. के. सुरेश, जालना येथून केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, दिंडोरीतून भारती पवार हे पराभूत झाले आहेत.

**<><><><><>**

जनतेनं रालोआवर तिसऱ्यांदा विश्वास दाखवला असून भारतीय इतिहासातली ही ऐतिहासिक घटना आहे, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. या प्रेमासाठी मी जनता जनार्दनाप्रती कृतज्ञता व्यक्त करतो आणि लोकांच्या आकांक्षा पूर्ण करणारं गेल्या दशकभरातलं चांगलं काम यापुढेही चालू राहील, याची ग्वाही देतो, असं त्यांनी नमूद केलं आहे. पक्ष कार्यकर्त्यांनी केलेल्या कठोर परिश्रमाला सलाम करत अशा अपवादात्मक कार्याला कोणतेही शब्द न्याय देऊ शकत नाहीत अशा शब्दात त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

**<><><><><>**

देशातील जनतेनं पुन्हा एकदा राष्ट्रीय लोकशाही आघाडीला संपूर्ण बहुमत प्रदान केलं असून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सलग तिसर्यांदा भारताचे पंतप्रधान होणार आहेत, असं भाजपचे नेते आणि राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. इंडिया आघाडीतील सर्व पक्ष मिळून जितक्या जागांवर आघाडीवर आहेत, त्यापेक्षा अधिक जागा एकट्या भाजपाच्या वाट्याला आल्या आहेत. शिवाय, आंध्रप्रदेशात तेलगू देसम पार्टीच्या नेतृत्त्वात भाजपा युतीला, तर ओडिशात भाजपाच्या नेतृत्त्वात दणदणीत यश मिळालं आहे असं फडणवीस यांनी या संदेशात म्हटलं आहे. देशभरातील सर्व कार्यकर्त्यांचं त्यांनी अभिनंदनही केलं आहे.

**<><><><><>**

निवडणूक निकालातून जनतेचा विजय आणि लोकशाहीचा विजय झाला असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी दिली आहे.

काँग्रेसला मिळालेल्या यशाबद्दल त्यांनी मतदारांचे आणि कार्यकर्त्यांचे आभार मानले. निवडणुकीच्या माध्यमातून गरीब मतदारांनी संविधानाचं आणि लोकशाहीचं संरक्षण केल्याची प्रतिक्रीया राहुल गांधी यांनी दिली. राष्ट्रीय लोकशाही आघाडीचा भाग असलेल्या आणि पूर्वी संयुक्त पुरोगामी आघाडीचे घटक असलेल्या पक्षांशी सत्तास्थापनेसाठी संपर्क साधणार का असा प्रश्न पत्रकारांनी विचारल्यावर त्यांनी सांगितलं की इंडिया आघाडीची बैठक उद्या होणार असून घटक पक्ष एकत्रितपणे याबाबत निर्णय घेतील.

**होल्ड--बाईट--(राहुल गांधी)**

**<><><><><>**

आंध्र प्रदेश आणि ओदिशा विधानसभेच्या निवडणुकीची मतमोजणी आज सुरू आहे.

आंध्र प्रदेशातल्या १७५ जागांपैकी सर्वाधिक म्हणजे **७३** जागांवर तेलुगु देसम पक्षाने विजय मिळवला असून ते **६२** जागांवर आघाडीवर आहेत. आत्ताचा सत्ताधारी वायएसआर काँग्रेसने **३** जागा जिंकल्या असून ते ८ जागांवर आघाडीवर आहेत. जनसेना पक्षाने **१३** जागा जिंकल्या असून ८ जागांवर ते आघाडीवर आहेत. तर भाजपने **५** जागा जिंकल्या असून **३** जागांवर ते विजयाच्या मार्गावर आहेत.

दरम्यान मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी यांनी पदाचा राजीनामा राज्यपालांकडे सादर केला आहे.

ओदिशा विधानसभेच्या १४७ जागांपैकी **३२** जागा भाजपाने जिंकल्या असून **४७** जागांवर भाजपा आघाडीवर आहे. तर सत्ताधारी बिजु जनता दलाला **२१** जागा राखण्यात यश आलं असून **२९** जागांवर ते आघाडीवर आहेत.

**<><><><><>**

मुंबई शेअर बाजारात आज मोठी पडझड नोंदवण्यात आली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आणि निफ्टीत पाच टक्क्यांहून अधिक घट झाली.

आज सकाळी बाजाराच्या कामकाजाला सुरुवात झाली तेव्हाच बाजारात घसरणीला सुरुवात झाली.

पहिल्या सत्रात सेन्सेक्स १ हजार ७०० अंकांनी तर निफ्टी ५०० अंकांनी कोसळला. ही पडझड दुसऱ्या सत्रातही कायम राहिली.

दिवसअखेर सेन्सेक्स ४ हजार ३९० अंकांची घसरण नोंदवत ७२ हजार ७९ अंकांवर बंद झाला. राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही १ हजार ३७९ अंकांची घसरण नोंदवत २१ हजार ८८४ अंकांवर बंद झाला.

शेअर बाजारात झालेल्या या पडझडीमुळे गुंतवणूकदारांचं सुमारे १० लाख ३२ कोटी रुपयांचं नुकसान झाल्याचा अंदाज आहे. कोरोनानंतर भारतीय शेअर बाजारात झालेली ही सर्वात मोठी पडझड आहे.

**<><><><><>**

**आत्तापर्यंत आलेल्या वृत्तानुसार**

आझाद समाज पार्टीनं एका जागेवर विजय मिळवला तर अपना दल एका जागेवर आघाडीवर आहे.

वाराणसी मतदारसंघात भाजपाचे उमेदवार आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी एक लाख ५२ हजार ५१३ मतांनी विजयी झाले आहेत. त्यांनी काँग्रेसचे अजय राय यांना पराभूत केलं आहे. रायबरेली मतदारसंघातून काँग्रेसचे राहुल गांधी यांनी भाजपाच्या दिनेश प्रताप सिंग यांचा तीन लाख ९० हजार ३० मतांनी पराभव केला आहे. तर अमेठीमध्ये काँग्रेसचे किशोरी लाल यांनी भाजपाच्या स्मृती इराणी यांचा एक लाख ६७ हजार १९६ मतांनी पराभव केला. लखनौ मतदारसंघातून भाजपाचे राजनाथ सिंह, मेरठ मतदारसंघातून अरूण गोविल आणि गोरखपूर मतदारसंघातून भाजपाचे रवी किशन विजयी झाले आहेत.

**बिहार**मध्ये लोकसभेच्या ४० जागांपैकी भाजपानं चार जागा जिंकल्या असून ८ ठिकाणी आघाडीवर आहे. जनता दल संयुक्त २ जागा जिंकल्या आहेत आणि दहा जागांवर आघाडीवर आहे. काँग्रेसनं एक जागा जिंकली असून दोन जागांवर आघाडीवर आहे. हिंदुस्थानी आवाम मोर्चा सेक्युलरनं एक जागा जिंकली असून लोक जनशक्ती पार्टी ५, राष्ट्रीय जनता दल ४ जागांवर आघाडीवर आहेत.

**मध्य प्रदेशा**त लोकसभेच्या २९ जागांपैकी भाजपानं १९ जागा जिंकल्या असून उर्वरित १० जागांवरही भाजपचेच वर्चस्व असल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. टिकमगरची जागा विरेन्द्र कुमार यांनी ४ लाख ३ हजार ३१२ इतक्या फरकाने जिंकली आहे तर इंदौर मतदारसंघात शंकर लालवानी यांनी ११ लाख ७५ हजार ९२ इतक्या विक्रमी फरकाने निवडणूक जिंकली आहे. विदिशा मतदारसंघात भाजपाचे शिवराजसिंग चौहान ८ लाख मतांनी आघाडीवर आहेत.

**राजस्थाना**तल्या २५ जागांपैकी भाजपानं १४ जागा जिंकल्या आहे तर काँग्रेसनं ८ जागा जिंकल्या आहेत. कोटा मतदारसंघातून भाजपाचे ओम बिर्ला विजयी झाले आहेत.

**उत्तराखंड** मधल्या सर्व पाच पैकी दोन जागा भारतीय जनता पार्टीनं जिंकल्या असून उर्वरित ३ जागांवर भाजपा आघाडीवर आहे.

**झारखंड**मधल्या १४ जागांपैकी भाजपानं १ जागा जिंकली असून सात जागांवर आघाडीवर आहे. झारखंड मुक्ती मोर्चा ३ तर काँग्रेसचे दोन उमेदवार, एजीएसयुपीचा एक उमेदवार आघाडीवर आहेत.

**छत्तिसगडमधे** ११ जागांपैकी भाजपानं एक जागा जिंकली असून ९ जागांवर भाजपा आघाडीवर असून एका जागेवर काँग्रेस आघाडीवर आहे.

**<><><><><>**

राष्ट्रीय चाचणी संस्थेनं वैद्यकीय पदवीपूर्व अभ्यासक्रमांसाठी घेतलेल्या नीट अर्थात राष्ट्रीय पात्रता आणि प्रवेश परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. संस्थेच्या संकेतस्थळावर हा निकाल उपलब्ध आहे. ही परीक्षा गेल्या ५ मे रोजी झाली होती.